CHANAKYANITI VYAVAHARA SARA SAMGRAHA

R S V L
00866

X.(W2)
N60
866

Poona Oriental Series No. 71

चाणक्य-नीति-व्यवहार-सारसंग्रहः ।

CĀṆAKYA-NĪTI-VYAVAHĀRA—SĀRA-SAṄGRAHA

(Practical, Ethical and Political Maxims of everyday use by Cāṇakya)
With a Marathi Translation

866

BY
GOVIND SAKHARAM SARDESAI,
KOLHAPUR

111





POONA
ORIENTAL BOOK AGENCY
1940

As. 8]

PUBLISHER'S NOTE

We now offer to the Public the first part of Cāṇakya's moral and practical sayings and hope to follow it up by five similar parts. Over 600 such verses and aphorisms are ascribed to Cāṇakya. If these verses be learnt by heart by anyone especially by students soon after commencing their study of Sanskrit, they would certainly be benefitted. The verses are like nutritive butter-balls that require time for thorough digesting. The life of Cāṇakya with various myths and traditions connected there with, his date, his place in literature, etc. would be dealtwith in the last Volume. Meanwhile the following verses may be recalled with some interest :

1. Names of Cāṇakya :—

"वात्स्यायनो मल्लनागः कौटिल्यश्चणकात्मजः ।
द्रामिलः पक्षिलस्वामी मल्लनागोऽङ्गुलश्च सः ॥"

2. Literary Estimate of his work :—

"नीतिशास्त्रामृतं धीमानर्थशास्त्रमहोदधेः ।
समुद्दध्रे नमस्तस्मै विष्णुगुप्ताय वेधसे ॥ १ ॥"

"येन शास्त्रं च शस्त्रं च नंदराजगता च भूः ।
अमर्षेणोद्धृतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम् ॥ २ ॥"

X:(W2) N60

All rights reserved by the publisher

Printed by—S. R. Sardesai, B.A., LL.B., at the Samarth Vidyalaya's Samarth Bharat Press, 41 Budhwar Peth, Poona 2.

Published by—Dr. N. G. Sardesai, L. M. & S., Manager, Oriental Book Agency, 15 Shukrawar Peth, Poona 2.

॥ श्रीः ॥

अथ चाणक्यनीतिसार-संग्रहः ।

प्रथमं शतकम् ।

संग्रहकारस्य निवेदनम्

नानाशास्त्रोद्धृतं वक्ष्ये राजनीतिसमुच्चयम् ।
सर्वबीजमिदं शास्त्रं चाणक्यं सारसंग्रहम् ॥ १ ॥
मूलसूत्रं प्रवक्ष्यामि चाणक्येन यथोदितम् ।
यस्य विज्ञानमात्रेण मूर्खो भवति पण्डितः ॥ २ ॥

अतिदर्पे हता लङ्का अतिमाने च कौरवाः ।
अतिदाने बलिर्बद्धः अति सर्वत्र वर्जयेत् ॥ ३ ॥
अदाता वंशदोषेण कर्मदोषात् दरिद्रता ।
उन्मादो मातृदोषेण पितृदोषेण मूर्खता ॥ ४ ॥
अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानि च ।
वञ्चनं चापमानं च मतिमान् न प्रकाशयेत् ॥ ५ ॥
अविद्यं जीवनं शून्यं दिक् शून्या चेदबान्धवा ।
पुत्रहीनं गृहं शून्यं सर्वशून्या दरिद्रता ॥ ६ ॥
अविद्यः पुरुषः शोच्यः शोच्यं मिथुनमप्रजम् ।
निराहाराः प्रजाः शोच्याः शोच्यं राज्यमराजकम् ॥७॥
अशोच्यो निर्धनः प्राज्ञोऽशोच्यः पण्डितबान्धवः ।
अशोच्या विधवा नारी पुत्रपौत्रप्रतिष्ठिता ॥ ८ ॥

असंतुष्टा द्विजा नष्टाः सन्तुष्टाः पार्थिवास्तथा ।
सलज्जा गणिका नष्टा निर्लज्जाश्च कुलस्त्रियः ॥ ९ ॥
असंभाव्यं न वक्तव्यं प्रत्यक्षमवलोकितम् ।
शिला तरति पानीये गीतं गायति वानरः ॥ १० ॥
अस्ति पुत्रो वशे यस्य भृत्यो भार्या तथैव च ।
अभावेऽप्यतिसन्तोषे स्वर्गस्थोऽसौ महीतले ॥ ११ ॥
आपदर्थं धनं रक्षेद् दारान् रक्षेद् धनैरपि ।
आत्मानं सततं रक्षेद् दारैरपि धनैरपि ॥ १२ ॥
आपदां कथितः पन्था इन्द्रियाणामसंयमः ।
तज्जयः संपदां मार्गो येनेष्टं तेन गम्यताम् ॥ १३ ॥
आयुर्वेदकृताभ्यासः सर्वेषां प्रियदर्शनः ।
आर्यशीलगुणोपेत एष वैद्यो विधीयते ॥ १४ ॥
आहारो द्विगुणः स्त्रीणां बुद्धिस्तासां चतुर्गुणा ।
षड्गुणो व्यवसायश्च कामश्चाऽष्टगुणः स्मृतः ॥ १५ ॥
इङ्गिताकारतत्त्वज्ञः बलवान् प्रियदर्शनः ।
अप्रमादी सदा दक्षः प्रतीहारः स उच्यते ॥ १६ ॥
उत्सवे व्यसने चैव दुर्भिक्षे शत्रुविग्रहे ।
राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ॥ १७ ॥
उपकारगृहीतेन शत्रुणा शत्रुमुद्धरेत् ।
पादलग्नं करस्थेन कण्टकेनैव कण्टकम् ॥ १८ ॥
ऋणकर्ता पिता शत्रुर् माता च व्यभिचारिणी ।
भार्या रूपवती शत्रुः पुत्रः शत्रुरपण्डितः ॥ १९ ॥

ऋणशेषोऽग्निशेषश्च व्याधिशेषस्तथैव च ।
पुनश्च वर्धते यस्मात् तस्माच्छेषं न कारयेत् ॥ २० ॥
एकस्यापि कुवृक्षस्य कोटरस्थेन वह्निना ।
दह्यते हि वनं सर्वं कुपुत्रेण कुलं यथा ॥ २१ ॥
एकेनापि सुवृक्षेण पुष्पितेन सुगन्धिना ।
वासितं तद्वनं सर्वं सुपुत्रेण कुलं यथा ॥ २२ ॥
कष्टा वृत्तिः पराधीना कष्टो वासो निराश्रयः ।
निर्धनो व्यवसायश्च सर्वकष्टा दरिद्रता ॥ २३ ॥
किं करिष्यन्ति वक्तारः श्रोता यत्र न विद्यते ।
नग्नक्षपणके देशे रजकः किं करिष्यति ॥ २४ ॥
किं कुलेन विशालेन गुणहीनस्तु यो नरः ।
अकुलीनोऽपि शास्त्रज्ञो दैवतैरपि पूज्यते ॥ २५ ॥
कुदेशं च कुवृत्तिं च कुभार्यां कुनदीं तथा ।
कुद्रव्यं च कुभोज्यं च वर्जयेत् तु विचक्षणः ॥ २६ ॥
कुदेशमासाद्य कुतोऽर्थसंचयः
कुपुत्रमासाद्य कुतो जलाञ्जलिः ।
कुगेहिनीं प्राप्य गृहे कुतः सुखम्
कुशिष्यमध्यापयतः कुतो यशः ॥ २७ ॥
कुलशीलगुणोपेतः सर्वधर्मपरायणः ।
प्रवीणः प्रेषणाध्यक्षो धर्माध्यक्षो विधीयते ॥ २८ ॥
कुलीनैः सह संपर्कं पण्डितैः सह मित्रताम् ।
ज्ञातिभिश्च समं मेलं कुर्वाणो न विनश्यति ॥ २९ ॥

कूपोदकं वटच्छाया श्यामा स्त्री चेष्टकालयम् ।
शीतकाले भवेदुष्णं ग्रीष्मकाले च शीतलम् ॥ ३० ॥
कोकिलानां स्वरो रूपं नारीरूपं पतिव्रता ।
विद्या रूपं कुरूपाणां क्षमा रूपं तपस्विनाम् ॥ ३१ ॥
कोऽतिभारः समर्थानां किं दूरं व्यवसायिनाम् ।
को विदेशः सुविद्यानां कः परः प्रियवादिनाम् ॥३२॥
गुरुरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरुः ।
पतिरेको गुरुः स्त्रीणां सर्वस्याऽभ्यागतो गुरुः ॥ ३३ ॥
घृतकुम्भसमा नारी तप्ताङ्गारसमः पुमान् ।
तस्माद् घृतं च वह्निं च नैकत्र स्थापयेद् बुधः ॥ ३४ ॥
चलत्येकेन पादेन तिष्ठत्येकेन बुद्धिमान् ।
नासमीक्ष्य परं स्थानं पूर्वमायतनं त्यजेत् ॥ ३५ ॥
चिन्ता ज्वरो मनुष्याणां वस्त्राणामातपो ज्वरः ।
असौभाग्यं ज्वरः स्त्रीणामश्वानां मैथुनं ज्वरः ॥ ३६ ॥
जानीयात् प्रेषणे भृत्यान् बान्धवान् व्यसनागमे ।
मित्रं चाऽऽपदि काले च भार्यां च विभवक्षये ॥ ३७ ॥
जीर्णमन्नं प्रशंसीयाद् भार्यां च गतयौवनाम् ।
रणात् प्रत्यागतं शूरं सस्यं च गृहमागतम् ॥ ३८ ॥
तस्करस्य कुतो धर्मो दुर्जनस्य कुतः क्षमा ।
वेश्यानां च कुतः स्नेहः कुतः सत्यं च कामिनाम् ॥३९॥
ताराणां भूषणं चन्द्रो नारीणां भूषणं पतिः ।
पृथिव्या भूषणं राजा विद्या सर्वस्य भूषणम् ॥ ४० ॥

त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।
ग्रामं जनपदस्याऽर्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥ ४१ ॥
दुरधीता विषं विद्या अजीर्णे भोजनं विषम् ।
विषं गोष्ठी दरिद्रस्य वृद्धस्य तरुणी विषम् ॥ ४२ ॥
दुर्जनः परिहर्तव्यो विद्ययाऽलङ्कृतोऽपि सन् ।
मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयङ्करः ॥ ४३ ॥
दुर्जनः प्रियवादी च नैतद् विश्वासकारणम् ।
मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् ॥ ४४ ॥
दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम् ।
बलं मूर्खस्य मौनित्वं चोराणामनृतं बलम् ॥ ४५ ॥
दुर्लभं प्राकृतं मित्रं दुर्लभः क्षेमकृत् सुतः ।
दुर्लभा सदृशी भार्या दुर्लभः स्वजनः प्रियः ॥ ४६ ॥
दुष्टा भार्या शठं मित्रं भृत्यश्चोत्तरदायकः ।
ससर्पे च गृहे वासो मृत्युरेव न संशयः ॥ ४७ ॥
दूरतः शोभते मूर्खो लम्बमानपटावृतः ।
तावच्च शोभते मूर्खो यावत् किञ्चिन् न भाषते ॥४८॥
धनधान्यप्रयोगेषु तथा विद्यागमेषु च ।
आहारे व्यवहारे च त्यक्तलज्जः सदा भवेत् ॥ ४९ ॥
धनिनः श्रोत्रियो राजा नदी वैद्यस्तु पंचमः ।
पञ्च यत्र न विद्यन्ते तत्र वासं न कारयेत् ॥ ५० ॥
न कश्चित् कस्यचिन्मित्रं न कश्चित् कस्यचिद् रिपुः ।
कारणेन हि जानाति मित्राणि च रिपूंस्तथा ॥ ५१ ॥

नखिनां च नदीनां च शृङ्गिणां शस्त्रपाणिनाम् ।
विश्वासो नैव कर्तव्यः स्त्रीषु राजकुलेषु च ॥ ५२ ॥
न च विद्यासमो बन्धुर् न च व्याधिसमो रिपुः ।
न चापत्यसमः स्नेहो न च दैवात् परं बलम् ॥ ५३ ॥
नदीकूले च ये वृक्षाः परहस्तगतं धनम् ।
कार्यं स्त्रीगोचरं यत् स्यात् सर्वं तद्विफलं भवेत् ॥ ५४ ॥
न विश्वसेदविश्वस्तं मित्रं चाऽपि न विश्वसेत् ।
कदाचित् कुपितं मित्रं सर्वदोषं प्रकाशयेत् ॥ ५५ ॥
पण्डिते च गुणाः सर्वे मूर्खे दोषा हि केवलम् ।
तस्मान् मूर्खसहस्रेषु प्राज्ञ एको विशिष्यते ॥ ५६ ॥
परदारं परद्रव्यं परिवादं परस्य च ।
परिहासं गुरोः स्थाने चापल्यं च विवर्जयेत् ॥ ५७ ॥
परोक्षे कार्यहन्तारं प्रत्यक्षे प्रियवादिनम् ।
वर्जयेत् तादृशं मित्रं विषकुम्भं पयोमुखम् ॥ ५८ ॥
पादपानां भयं वातात् पद्मानां शिशिराद् भयम् ।
पर्वतानां भयं वज्रात् साधूनां दुर्जनाद् भयम् ॥ ५९ ॥
पुत्रपौत्रगुणोपेतः शास्त्रज्ञो मिष्टपाचकः ।
शूरश्च कठिनश्चैव सूपकारः स उच्यते ॥ ६० ॥
पुत्रप्रयोजना दाराः पुत्रः पिण्डप्रयोजनः ।
हितप्रयोजनं मित्रं धनं सर्वप्रयोजनम् ॥ ६१ ॥
पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम् ।
कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद् धनम् ॥६२॥

प्रथमे नार्जिता विद्या द्वितीये नार्जितं धनम् ।
तृतीये नार्जितं पुण्यम् चतुर्थे किं करिष्यति ॥ ६३ ॥
प्रदोषे निहतः पन्थाः पतिता निहताः स्त्रियः ।
अल्पबीजं हतं क्षेत्रं भृत्यदोषात् हतः प्रभुः ॥ ६४ ॥
प्राज्ञे नियुज्यमाने तु सन्ति राज्ञस् त्रयो गुणाः ।
यशः स्वर्गनिवासश्च विपुलश्च धनागमः ॥ ६५ ॥
प्रेषितस्य कुतो मानः कोपनस्य कुतः सुखम् ।
स्त्रीणां कुतः सतीत्वं च कुतो मैत्री खलस्य च ॥६६॥
बहुभिर् मूर्खसंघातैरन्योन्यपशुवृत्तिभिः ।
प्रच्छाद्यन्ते गुणाः सर्वे मेघैरिव दिवाकरः ॥ ६७ ॥
ब्रह्महाऽपि नरः पूज्यो यस्याऽस्ति विपुलं धनम् ।
शशिनस्तुल्यवंशोऽपि निर्धनः परिभूयते ॥ ६८ ॥
भोज्यं भोजनशक्तिश्च रतिशक्तिर् वराः स्त्रियः ।
विभवो दानशक्तिश्च नाल्पस्य तपसः फलम् ॥ ६९ ॥
मनसा चिन्तितं कर्म वचसा न प्रकाशयेत् ।
अन्यलक्षितकार्यस्य यतः सिद्धिर् न जायते ॥ ७० ॥
माता यस्य गृहे नास्ति भार्या चाऽप्रियवादिनी ।
अरण्यं तेन गन्तव्यं यथाऽरण्यं तथा गृहम् ॥ ७१ ॥
माता शत्रुः पिता वैरी येन बालो न पाठितः ।
न शोभते सभामध्ये हंसमध्ये बको यथा ॥ ७२ ॥
मातृवत् परदारेषु परद्रव्येषु लोष्टवत् ।
आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पण्डितः ॥ ७३ ॥

मूर्खे नियुज्यमाने तु त्रयो दोषा महीपतेः ।
अयशश्चाऽर्थनाशश्च नरके गमनं तथा ॥ ७४ ॥
मेधावी वाक्पटुः प्राज्ञः परचित्तोपलक्षकः ।
धीरो यथोक्तवादी च एष दूतो विधीयते ॥ ७५ ॥
यस्मिन् देशे न सम्मानो न प्रीतिर् न च बान्धवाः ।
न च विद्यागमः कश्चित् तं देशं परिवर्जयेत् ॥ ७६ ॥
यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम् ।
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति ॥ ७७ ॥
यो ध्रुवाणि परित्यज्य अध्रुवं परिषेवते ।
ध्रुवाणि तस्य नश्यन्ति अध्रुवं नष्टमेव च ॥ ७८ ॥
रूपयौवनसंपन्ना विशालकुलसंभवाः ।
विद्याहीना न शोभन्ते निर्गन्धा इव किंशुकाः ॥ ७९ ॥
लालयेत् पञ्च वर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् ।
प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ॥ ८० ॥
लालने बहवो दोषास् ताडने बहवो गुणाः ।
तस्मात् पुत्रं च शिष्यं च ताडयेन् न तु लालयेत् ॥८१॥
लुब्धमर्थेन गृह्णीयात् क्रुद्धमञ्जलिकर्मणा ।
मूर्खं छन्दोऽनुवृत्तेन याथातथ्येन पण्डितम् ॥ ८२ ॥
वरमेको गुणी पुत्रो न च मूर्खशतान्यपि ।
एकश्चन्द्रस्तमो हन्ति न च तारागणोऽपि ॥ ८३ ॥
विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥ ८४ ॥

R S V L
00866

विषं चङ्क्रमणं रात्रौ विषं राज्ञोऽनुकूलत
विषं स्त्रियोऽन्यहृदो विषं व्याधिरवीः
विषादप्यमृतं ग्राह्यम् अमेध्यादपि काञ्चनम् ।
नीचादप्युत्तमा विद्या स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥ ८६ ॥
वेदवेदाङ्गतत्त्वज्ञो जपहोमपरायणः ।
आशीर्वादवचोयुक्त एष राजपुरोहितः ॥ ८७ ॥
शुष्कं मांसं स्त्रियो वृद्धा बालार्कस् तरुणं दधि ।
प्रभाते मैथुनं निद्रा सद्यः प्राणहराणि षट् ॥ ८८ ॥
शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने ॥ ८९ ॥
सद्यो मांसं नवान्नं च बाला स्त्री क्षीरभोजनम् ।
घृतमुष्णोदकं चैव सद्यः प्राणकराणि षट् ॥ ९० ॥
सर्पः क्रूरः खलः क्रूरः सर्पात् क्रूरतरः खलः ।
मन्त्रौषधिवशः सर्पः खलः केन निवार्यते ॥ ९१ ॥
सकृद् दुष्टं च मित्रं यः पुनः सन्धातुमिच्छति ।
स मृत्युमुपगृह्णाति गर्भं कर्कटकी यथा ॥ ९२ ॥
सकृदुक्तगृहीतार्थो लघुहस्तो जिताक्षरः ।
सर्वशास्त्रसमालोकी प्रकृष्टो नाम लेखकः ॥ ९३ ॥
समस्तनीतिशास्त्रज्ञो वाहने पूजितश्रमः ।
शौर्यवीर्यगुणोपेतः सेनाध्यक्षो विधीयते ॥ ९४ ॥
समुद्रावरणा भूमिः प्राकारावरणं गृहम् ।
नरेन्द्रावरणा देशाश्चरित्रावरणाः स्त्रियः ॥ ९५ ॥

सिंहादेकं बकादेकं षट् शुनस् त्रीणि गर्दभात् ।
वायसाच्च तु शिक्षेत चत्वारि कुक्कुटादपि ॥ ९६ ॥
प्रभूतमल्पकार्यं वा यो नरः कर्तुमिच्छति ।
सम्यग् यत्नेन तत् कुर्यात् सिंहादेकं प्रकीर्तितम् ॥९७॥
सर्वेन्द्रियाणि संयम्य बकवत् पतितो जनः ।
कालदेशोपपन्नानि सर्वकार्याणि साधयेत् ॥ ९८ ॥
बह्वाशी स्वल्पसंतुष्टः सुनिद्रः शीघ्रचेतनः ।
प्रभुभक्तश्च शूरश्च ज्ञातव्याः षट् शुनो गुणाः ॥ ९९ ॥
अविश्रान्तं वहेद्भारं शीतोष्णं च न विन्दति ।
संतुष्टश्च तथा नित्यं त्रीणि शिक्षेत गर्दभात् ॥ १०० ॥
गूढमैथुनधर्मं च काले काले च संग्रहम् ।
अप्रमादमनालस्यं च तु शिक्षेत वायसात् ॥ १०१ ॥
युद्धं च प्रातरुत्थानं भोजनं सह बन्धुभिः ।
स्त्रियमापद्गतां रक्षेच् च तु शिक्षेत कुक्कुटात् ॥१०२॥
सुभिक्षं कृपके नित्यं नित्यं सुखमरोगिणि ।
भार्या भर्तुः प्रिया यस्य तस्य नित्योत्सवं गृहम् ॥१०३॥
सेवितव्यो महावृक्षः फलच्छायासमन्वितः ।
यदि दैवात् फलं नास्ति छाया केन निवार्यते ॥१०४॥
हतमश्रोत्रियं श्राद्धं हतो यज्ञस्त्वदक्षिणः ।
हता रूपवती वन्ध्या हतं सैन्यमनायकम् ॥ १०५ ॥
हेला स्यात् कार्यनाशाय बुद्धिनाशाय निर्धनम् ।
याचना माननाशाय कुलनाशाय भोजनम् ॥ १०६ ॥

इति श्रीचाणक्यनीतिसारसंग्रहस्य प्रथमं शतकं समाप्तम् ।

॥ श्रीः ॥

आर्यचाणक्याचीं सर्वोत्तम नीतिव्यवहारसूक्तें

[मराठी भाषांतर]

प्रथम शतक

संग्रहकाराचें निवेदन—

आर्य चाणक्यानें रचिलेल्या निरनिराळ्या शास्त्रांतून काढलेल्या आणि त्या सर्व शास्त्रांचें जणूं बीजच, तसेंच त्या सर्व शास्त्रांचें तात्पर्यच अशा नीति आणि व्यवहार यांच्या तत्त्वांचा हा संग्रह मी आतां सांगत आहें. १

चाणक्यानें सांगितल्याप्रमाणेंच त्याचे आरंभींचे सिद्धांत मी सांगतों. ह्या सिद्धांतांची मनाला बरोबर समजूत पडून त्यांचें व्यवहारांत आचरण घडल्यास अगदीं अजाणता मनुष्य ही निःसंशय विद्वान् होईल. २

अकारविल्हेनें लिहिलेलें चाणक्य शतक

अतिशय घमेंडीनें रावणानें लंकेचें राज्य गमाविल; अत्यंत दुराग्रहानें (हट्टानें) कौरवांचा फडशा उडाला; (एवढेंच नव्हे, तर) उदारपणा (हा सद्गुण असतां तोहि) मर्यादेबाहेर नेल्यानें बली (सारखा दाता सार्वभौम-पदाला मुकून पातालांत) स्थानबद्ध होऊन राहिला. तेव्हां तात्पर्य काय कीं, कोणतीहि गोष्ट अति होऊं देणें टाळावें. " अति तेथें माती ! " ३

हलक्या कुळाचा संसर्ग हा कद्रूपणास कारण होतो; कर्तव्याची हेळसांड झाली कीं दारिद्र्याला आमंत्रण मिळालेंच. आईनें लहानपणीं मुलांस योग्य वळण लावलें नाहीं तर तीं हट्टी, उनाड व मस्तवाल होतात आणि योग्य वेळीं बापानें मुलांस शिक्षण देण्याची हयगय केल्यास तीं मूर्ख बनतात. (दोष = मोठी चुकी.) ४

द्रव्याची हानि, मनाचा संताप, घरांतल्या भानगडी, स्वतःची फसवणूक आणि अपमान या पांच गोष्टींचा शाहण्यानें बोभाट करूं नये. ५

विद्येवांचून आयुष्य व्यर्थ; ज्या जागीं साह्य करणारे शेजारी नाहींत किंवा जेथें आपल्या वांकड्यावर असणारे लोक आहेत ती जागा वसतीस निरुपयोगी; ज्या घरांत मूल (मुलगा) नाहीं तें घर असून नसल्यासारखेंच; आणि दारिद्र्य म्हटलें म्हणजे सर्वच गोष्टींचा बाजा होय. ६

विद्याविहीन पुरुषाचें जिण तापदायक; संततिविहीन जोडपें स्वतः असंतुष्ट व इतरांस अनुकंपनीय; पोटास चिमटा बसलेलीं पोरें किंवा राज्यांतील अन्नास मोताद झालेली प्रजा यांची स्थिति शोकजनक; आणि जेथें शास्ता नाहीं असें राज्य भयप्रद. ७

विद्वान् मनुष्याच्या दारिद्र्याला कोणी नांवें ठेवीत नाहींत; विद्वान् लोकांची मैत्री ज्याला लाभली आहे तो स्वतः विद्वान् नसला तरी त्याला कोणी हंसत नाहीं. त्याप्रमाणेंच मुलगे, नातू असलेल्या पोक्त बाईला वैधव्य आलें तरी तिच्या त्या अवस्थेबद्दल लोकांस विशेष काळजी करण्याचें कारण नसतें. ८

भिक्षुक किंवा याचक ब्राह्मण मिळेल तेवढ्यानें समाधान पावला नाहीं तर (त्याच्या हांवरेपणामुळें दात्यांच्या रागास बळी पडण्याची पाळी येऊन तो त्यांची सहानुभूति गमावतो व त्यामुळें) त्याचा तोटा होत जातो; पूर्वार्जित हातीं पडलेल्या राज्यावरच खुप राहून जो राजा तें वाढविण्याची तरतूद करीत नाहीं तो हातीं असलेलेंहि वेळेनुसार घालवून बसतो. वेश्येचा धंदा करणारी स्त्री गरतीप्रमाणें लाजूं लागल्यास तिचा सर्वस्वीं नाश होतो, आणि कुलीन स्त्रिया वेश्येच्या निलाजरेपणानें वागूं लागल्या तर त्या पूर्ण अधोगतीस पोंचतात. ९

"पाण्यावर दगड तरंगतो", "वानर गाणें गातो", असल्या अशक्य किंवा ऐकणारांस न पटणाऱ्या गोष्टी कधीं बोलूं नयेत; मग त्या रामायणांत वाचलेल्या असोत किंवा प्रत्यक्ष पाहिलेल्या देखील असोत. १०

मुलगा, नोकर तशीच बायको हीं ज्याच्या अर्ध्या वचनांत असतील आणि कोणत्याहि गोष्टीची वाण असली तरीहि ज्याची समाधानवृत्ति बिघडत नाहीं तो पृथ्वीतलावर असूनहि स्वर्गलोकींच असल्याप्रमाणें आहे. ११

(भावी) संकटकालीं उपयोग व्हावा म्हणून पैशाला जपावें; बायकांचें रक्षण करण्यांत पैसा खर्चण्यास हयगय करूं नये; आणि आत्मरक्षणार्थ बायको काय आणि धन काय दोन्हीहि वेंचण्यास मागेंपुढें पाहूं नये. १२

इंद्रियांवर ताबा नसणें हा आपत्तीकडे जाण्याचा मार्ग असून तीं ताब्यांत ठेवणें हा संपत्तीकडे नेणारा मार्ग आहे; (हें ध्यानांत धरून) ज्याला जो पसंत असेल तो त्यानें (खुशाल) पकडावा.

आयुर्वेदाचा (वैद्यकशास्त्राचा) ज्यानें चांगला अभ्यास केला आहे, ज्याला पाहतांच सर्वांस समाधान वाटतें आणि आर्य (श्रेष्ठ) लोकांचें शील व गुण ज्याच्या अंगीं आहेत त्याचा "वैद्य" या नात्यानें सन्मान होतो. १४

स्त्रियांचा आहार पुरुषांच्या दुप्पट असतो, बुद्धि चौपट, प्रपंचविषयक कामांचा त्यांचा उरक सहापट असून, संभोगशक्ति आठपट असते, असें म्हणतात. १५

तोंडावर दिसणाऱ्या विकारांवरून व इतर अवयवांच्या हावभावांवरून मालकाच्या मनांतील आशय ओळखणारा, सशक्त, पाहणारांच्या मनांत भरणारा, आपल्या कर्तव्यांत न चुकणारा, सतत सर्वत्र नजर ठेवणारा, अशा द्वाररक्षकाला प्रति(ती)हार म्हणतात. (असा द्वाररक्षक 'प्रतिहार' संज्ञेस योग्य आहे.) १६

उत्साहाच्या वेळेप्रमाणेंच संकटकालींहि जो आपल्याबरोबर राहतो (सोडून जात नाहीं) तोच खरा मित्र (साह्यकर्ता); आपली अन्नान्नदशा झाली असो किंवा शत्रूंशीं आपली जुंपली असो तो आपला पाठीराखा असतो. राजाच्या भेटीस जाण्याचें असो वा प्रेतसंस्कारार्थ स्मशानांत जावें लागो तो आपला सहचर असतो. अशालाच 'बांधव' म्हणतां येईल. १७

उपकार करून आपलासा करून घेतलेल्या पूर्वशत्रूकरवीं नवा शत्रु नाहींसा करावा (त्यांत एकतर त्याच्या कृतज्ञतेची परीक्षा होते आणि दुसरी गोष्ट ही कीं नव्या शत्रूच्या नाशाकरितां आपला एखादा पक्षपाती पाठविण्याचें वांचतें); जसें आपल्या पायांत कांटा मोडल्यास दुसरा कांटाच हातीं घेऊन त्यानें आपण पायांतला काढतों तसें. दोन्ही कांटेच (पायांत बोंचले तर सारखेच त्रासदायक, पण हातीं धरला म्हणजे त्याच्याकडून दुसऱ्याचा मोक्ष करितां येतो). १८

(मुलांना) कर्ज करून ठेवणारा बाप त्यांचा वैरीच होय; त्याप्रमाणें व्यभिचारी आइहि मुलांची वैरीण होय. सुस्वरूप बायको म्हणून नवऱ्याला (केव्हां अब्रू घेईल अशा चिंतेत पाडणारी) शत्रूप्रमाणें वाटणारी आणि मूर्ख पोरगा बापाला वैऱ्यासारखा दिसणारा होय. १९

कर्ज (लोकांचें देणें), विस्तव, तसाच शारीरिक रोग या तिघांचा अल्पहि भाग मागें राहिला (म्हणजे त्या तिहींचा पूर्ण निरास झाला नाहीं) तर तीं पुनः हटकून वाढीस लागतात (व पूर्वीपेक्षांहि तापदायक होतात), यास्तव तीं निःशेषच करून टाकिलीं पाहिजेत. २०

जंगलांतल्या केवळ एखाद्या वठलेल्या झाडाच्या ढोलींतील अग्नीमुळें सर्व जंगल जळून जातें त्याप्रमाणें कुलांत (घराण्यांत) एक जरी मुलगा वाईट निपजला तरी त्याच्यामुळें सर्व कुलाचा नाश होतो. (सर्व वन ज्याप्रमाणें त्या अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडण्याचा संभव असतो त्याप्रमाणें एका दुश्चरित मुलामुळें सर्व घराण्याचा अधःपात संभवतो.) २१

वनांत चांगला टवटवीत असा एक जरी वृक्ष सुवासिक फुलांनीं भरारला तरी सर्व वन सुवासित होतें, त्याप्रमाणें कुलांत एक जरी सद्गुणी मुलगा झाला तरी सर्व कुल सुप्रसिद्ध (कीर्तिमान्) होतें. २२

परक्यांच्या आधारानें चाललेलें जीवन (निर्वाहाचें साधन) दुःखदायक तसेंच अनाश्रित (म्ह. आसपास शेजारीपाजारी नाहींत असें) वसतिस्थान भयप्रद (भयाण); ज्यांत पैसा मिळत नाहीं तो धंदा कष्टकारक आणि दारिद्र्य म्हटलें कीं तें हरएक प्रकारच्या दुःखांचें माहेरघरच. २३

जेथें ऐकायला कोणीच नाहीं तेथें वक्त्यांचा काय उपयोग ? दिगंबर (नागव्या) क्षपणकांचीच (जैन किंवा बौद्ध भिक्षूंची) जेथें वसाहत तेथें परटाचें काय काम ? २४

कसलाहि गुण अंगांत नाहीं असा माणूस नुसत्या मोठ्या विस्तृत कुलांत जन्मास आला म्हणून काय झालें ? २५

अथवा

केवळ मोठ्या (विख्यात) कुलांत जन्मलेल्या गुणहीन मनुष्याला घेऊन काय करावयाचें आहे ?

कुलवान् नसतांहि जो विद्यासंपन्न होतो तो देवतांनादेखील मान्य होतो.

दूरदर्शी शाहण्या मनुष्यानें पुढील गोष्टींचा अवश्य त्याग करावा— १. भिकार देश, २. निर्वाहाचा हीन मार्ग, ३. भांडकुदळ बायको, ४. बिकट नदी, ५. पाप-द्रव्य, आणि ६. कदन्न (वाईट खाद्य). २६

भिकार देशांत राहून द्रव्यसंचय कसा होईल? मुलगा दुराचारी निघाल्यास तर्पणाच्या पाण्याची आशा देखील नको! दुराचारी बायको मिळाल्यास गृहसुखाचें नांव कशाला? निर्बुद्ध शिष्याला पढविणाऱ्या गुरूला यशःप्राप्ति कशी होणार? २७

कुलवान्, सुशील व गुणवान् असून धर्मपरायण (धर्मशास्त्र व व्यवहार जाणता व त्याप्रमाणें आचरण ठेवणारा), तसाच हाताखालील नोकरचाकरांकडून योग्य प्रकारें त्यांचीं कामें करवून घेण्यांत चतुर असा मनुष्यच धर्माध्यक्ष (न्यायाधिकाऱ्याच्या) पदाला योग्य असतो. २८

चांगल्या कुळांत उत्पन्न झालेल्यांशीं सहवास ठेवणारा, विद्वानांशीं मैत्री जोडणारा, ज्ञातिबांधवांशीं मिळूनमिसळून वागणारा असा माणूस सहसा नुकसानींत येत नाहीं. २९

विहिरीचें पाणी, वडाच्या झाडाची सांवली, श्यामा§ स्त्री आणि विटांचें घर हीं चार थंडीच्या दिवसांत ऊबदार आणि उन्हाळ्यांत गार-म्हणून सर्वदा सुखदायकच-असतात. ३०

§श्यामा स्त्रीची व्याख्या खालीं दिली आहे—

शीते सुखोष्णसर्वांगी ग्रीष्मे या सुखशीतला।
तप्तकांचनवर्णाभा सा स्त्री श्यामेति कथ्यते॥

(थंडीच्या दिवसांत जिचें सर्व अंग सुखदायक असें ऊबदार असतें व उन्हाळ्याच्या दिवसांत जिचें सर्व अंग सुखकारक होईल असें शीतल लागतें आणि जिच्या अंगाची कांति तापलेल्या सोन्याच्या रंगाची असते तिला **श्यामा** स्त्री म्हणतात.)

कोकिळांचें खरें सौंदर्य (आकर्षकत्व) त्यांच्या आलापांत, बायकांचें त्यांच्या पातिव्रत्यांत, कुरूप माणसांचें त्यांच्या विद्यासंपदेंत आणि तपस्वी जनांचें त्यांच्या क्षमाशीलतेंत (दयेंत) असतें-तें त्यांच्या बाह्य आकारांत पाहण्यांत अर्थ नाहीं. ३१

रूपं Beauty, Grace, Elegance विद्यानाम नरस्य रूपम्...

अंगांत भरपूर ताकद असणाऱ्यांना कसल ओझें? उद्योगशीलांस कोणती वस्तु दुर्लभ? विद्वानांस कोणता देश परका? गोड बोलणारा कुणाला नावडेल? ३२

ब्राह्मण, क्षत्रिय आणि वश्य यांना अग्नि पूज्य; चार वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ; बायकांचें सर्वस्व म्ह. नवरा आणि घरीं आलेला पाहुणा हा सर्वांसच आदरणीय होय. ३३

स्त्री ही घट्ट तुपाच्या भांड्यासारखी असून पुरुष हा जळजळीत विस्तवासारखा आहे; म्हणून शाहण्या माणसानें दोघांना एके जागीं ठेवूं नये. (संसर्गानें तूप विरघळणारच). ३४

विचारी मनुष्य एक पाय जमिनीवर पुरता ठेवून मग पुढें जाण्यास दुसरा उचलतो (पुढ पाऊल टाकण्यापूर्वी वाटेचें निरीक्षण केल्याखेरीज राहत नाहीं); म्हणून नव्या जागीं जाणें सुरक्षित असल्याची खात्री करून घेतल्याशिवाय मूळची जागा (अविचारानें एकाएकीं) सोडूं नये. ३५

मनुष्यांना काळजी, कापडांना उन्ह, बायकांना नवऱ्याच्या प्रेमाचा अभाव आणि अश्वांना माद्यांशीं संगम–तापदायक होतात. ३६

सौभाग्य = स्त्री-पुरुषांचें एकमेकांवरील निःसीम प्रेम.

कामगारीवर पाठविल्यावर सेवकांची, संकटें आलीं असतां आप्तांची, आपत्कालीं मित्रांची आणि भरभराट संपल्यावर बायकोची (पूर्वीच्या व नंतरच्या त्यांच्या वागणुकींतील फेरफारावरून) खरी परीक्षा होते. ३७

(अन्नार्थी असेल त्यानें मिळालेल्या) शिळ्यापाक्या अन्नाची प्रशंसाच करावी; यौवन उलटून गेलेल्या भार्येची (नवऱ्यानें) वाखाणणीच करीत असावें; समरांगणांतून परत आलेल्या शूराचा (इतरांनीं) बडेजाव गावा; (दाम मोजावयास न लागलेल्या) घरीं आलेल्या (अर्थात् कोणीं आणून दिलेल्या) धान्याची (मग तें कोणत्याहि स्थितींत असलें तरी–गरीबांनीं) वाखाणणीच करावी (नांवें ठेवून नाखुषी दाखवूं नये). ३८

चोरापासून धर्म्य वर्तनाची, दुर्जनापासून क्षमेची, बाजारबसव्यांपासून प्रेमाची आणि कामातुरांपासून खरेपणाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. ३९

नक्षत्रांना शोभा चंद्रामुळें; स्त्रियांना शोभा पतीमुळें; पृथ्वीला शोभा राजामुळें; पण कोणालाहि शोभा विद्येमुळें प्राप्त होते. ४०

कुळाच्या रक्षणाकरितां त्यांतील एखाद्या व्यक्तीचा त्याग पत्करावा; सगळ्या गांवाचें रक्षण होत असल्यास त्यांतील एका कुटुंबाचा त्याग करावा लागला तरी चिंता नाहीं; (त्याच न्यायानें) एका गांवाच्या नाशानें सबंध देशाचा बचाव होत असल्यास गांवावर पाणी सोडावें आणि आत्म्याच्या मोक्षापायीं सर्व पृथ्वीचाहि त्याग करण्यास कचरूं नये. ४१

मोरोपंत म्हणतात—

राया ! कुलार्थ पुरुष, ग्रामार्थहि कुल समस्त सोडाव ।
ग्रामहि देशार्थ, मही आत्मार्थ, बुधें भलेंचि जोडावें ॥

अर्धवट केलेली विद्या परिणामीं हानिकारक होते. खाल्लेलें अन्न पचण्यापूर्वीच पुनः जेवणें म्हणजे विषसेवन करणें होय. गरीबीच्या घरास पोंचलेल्या माणसाला घरीं राहावयास आलेलें आप्तांचें लटांबर म्हणजे मोठी आपत्ति (मोठें संकट) होय; म्हाताऱ्या मनुष्याला तरुण भार्या म्हणजे विषवत् होय. ४२

विद्येंत निपुण असूनहि जर मनुष्य वर्तनानें दुष्ट असेल तर त्याची संगत टाळावी; नागसापाच्या मस्तकांत रत्न असतें म्हणून तो भयंकर नव्हे कीं काय ? ४३

दुष्ट मनुष्य मोठा गोडबोल्या असला तरी तो विश्वास ठेवण्यास योग्य नव्हे; कां कीं त्याच्या जिव्हाग्रावर जरी मध असला (मधुरभाषी जरी तो असला) तरी त्याच्या पोटांत हालाहल विष असतें. (मनांत घातकी कपट असतें.) ४४

(गुंडांपासून रक्षण होण्यास्तव) दुर्बल माणसाला राजाच्या न्यायबुद्धीवर विसंबावें लागतें; (पाहिजे असलेल्या) वस्तूच्या प्राप्तीकरितां लहान मुलांचा मुख्य आधार म्हणजे रोदन (रडणें); मूर्ख मनुष्याचें बळ गप्प बसण्यांत (तोंड उघडलें कीं त्याचा मूर्खपणा प्रगट झालाच); आणि चोरांची मुख्य शक्ति म्हणजे खोटें बोलण्यांतलें प्रावीण्य. ४५

स्वाभाविक (आपल्या स्वभावाशीं किंवा प्रकृतीशीं जुळणारा) मित्र मिळणें कठीण; आपला योगक्षेम चालविणारा पुत्र मिळणें कठीण; सर्व प्रकारें आपल्याप्रमाणें असणारी बायको प्राप्त होणें कठीण, आणि आपल्याशीं गोडीगुलाबीनें वागणारे भाऊबंद मिळणें कठीण. ४६

दुष्ट स्वभावाची व वर्तनाची बायको, लफंगा व लुच्चा मित्र, तोंडाला तोंड देणारा नोकर आणि सर्प असलेल्या घरांत वसति, हीं साक्षात् मृत्यु-रूपच होत यांत संशय नाहीं. ४७

मोठमोठीं उंचीं वस्त्रें अंगावर असलेला मूर्ख मनुष्य दूर आहे तंवरच ठाकठीक दिसतो; तसेंच तो जोंपर्यंत तोंड उघडीत नाहीं (बोलत नाहीं) तोंपर्यंतच (केवळ बाह्य दिमाखावर) त्याची शोभा राहते. (जवळ आल्या-वर किंवा बोलूं लागला म्हणजे त्याचें सत्य स्वरूप उघडकीस येतें–सिंहाचें कातडें पांघरलेल्या गाढवाच्या ओरडण्यानें जसें त्याचें बेंड फुटलें तसें होतें.) ४८

धन व धान्य यांच्या देवघेवींत, तसेंच नाना विद्यांची प्राप्ति करून घेण्यांत, जेवणाचे वेळीं, इतरांशीं कोणताहि व्यवहार करतांना केव्हांहि कोणाची भीड धरूं नये. (भीड धरल्यास देवघेवींत तोटा होतो, विद्याभ्यासांत शंका-निवृत्ति होत नाहीं, भोजनांत पोट भरत नाहीं, आणि भिडेचा व्यवहार अंगाशीं येतो. ' भीड भिकेची बहीण ' ही उक्ति प्रसिद्धच आहे.) ४९

ज्या ज्या ठिकाणीं १. धनवान् लोक, २. विद्वान् ब्राह्मण, ३. राजा. ४. नदी, आणि ५. वैद्य हे पंचक नाहीं त्या ठिकाणीं कधीं वसती करूं नये. ५०

मुळांत कोणीहि कोणाचा मित्र नसतो, त्याप्रमाणें कोणी कोणाचा शत्रुहि नसतो. कांहींतरी कारण घडलें म्हणजे मित्र कोणते व शत्रु कोणते तें समजून येतें. ५१

तीक्ष्ण नखें असणारे पशुपक्षी, नद्या, शिंगें असलेले प्राणी, व शस्त्रधारी लोक यांजवर पूर्णपणें विश्वसूं नये. तद्वत् स्त्रिया आणि राजकुलांतलीं माणसें यांचाहि विश्वास धरूं नये. (कारण त्यांजपासून केव्हां घात होईल याचा नेम नसतो). ५२

विद्येएवढा हितकर्ता नाहीं; रोगाएवढा शत्रु नाहीं; अपत्यांवरील प्रेमाला दुसरी तोड नाहीं; आणि दैवाहून अन्य कोणी प्रबळ नाहीं. ५३

नदीच्या कांठीं असणारे वृक्ष, परक्याच्या हातांत गेलेला पैसा, स्त्रियांना ठाऊक झालेली मसलत हीं परिणामीं (अखेर) निष्फळ होतात (फुकट जातात). ५४

वृक्ष केव्हां वाहून जातील त्याचा नेम नसतो (आणि तसे ते गेले नाहींत तरी त्यांजवरील फळें येणारे जाणारे पाडून घेऊन जातात.), दुसऱ्यास दिलेल्या पैसा (अनेक वेळां बुडतो, किंवा त्याजकडून काढण्यास फार कष्ट पडतात, निदान आपल्यास त्याचा) वेळेवर उपयोग होत नाहीं. स्त्रियांकडून गुप्त मसलती हटकून फुटतात (आणि त्यामुळें विरोध उत्पन्न होऊन त्या सिद्धीस जात नाहींत).

ज्यावर आपला विश्वास नाहीं त्याजवळ आपली गुप्त गोष्ट कधींहि सांगूं नये; एवढेंच काय, परंतु ज्याला आपण आपला मित्र समजतों त्याच्यावरहि सर्वस्वीं विश्वास टाकूं नये; कारण प्रसंगीं मित्र आपल्यावर रागावला तर त्या रागाच्या भरांत तो त्या गोष्टींतील दोषांचा (उणीवांचा) स्फोट (बोभाट) करण्याचा संभव असतो. ५५

खऱ्या पंडिताच्या ठिकाणीं सद्गुणांचें बाहुल्य असतें, मूर्ख मनुष्य दोषांचें (दुर्गुणांचें) आगर असतो. म्हणून हजारों मूर्खांपेक्षां एक पंडित बरा. (एका पंडिताची बरोबरी हजारों मूर्खांना करितां येत नाहीं.) ५६

दुसऱ्याच्या बायकोचा अभिलाष, परद्रव्याचा अपहार, दुसऱ्यांची तोंडावर किंवा पाठीमागें निंदा-टवाळी करूं नये. तसेंच वडील माणसांसमोर थट्टा-मस्करी अथवा दांडगाईचें वर्तन कधींहि करूं नये. ५७

चापल्यं–Rash conduct.

तोंडदेखलें गोड बोलणाऱ्या परंतु पाठ फिरली कीं कार्यास विघात करणाऱ्या मित्राची संगत टाकून द्यावी. असला मित्र म्हणजे विषानें भरलेल्या परंतु तोंडाजवळ दूध दिसत असलेल्या भांड्याप्रमाणें समजावा. ५८

झाडांना वाऱ्यापासून भय, कमलांना हिंवाळ्यांतील थंडीचें भय, पर्वतांस वज्रा(विजे)चें भय आणि साधूंना दुर्जनांपासून भय–असतें. ५९

मुलगे नातू ज्यास आहेत, ज्याला सूप(पाक)शास्त्राचें चांगलें ज्ञान आहे, खाण्यास मिष्ट व पचण्यास सुलभ अशीं पक्कान्नें करणारा, धीट आणि सोशिक अशा माणसाला 'सूपकार' म्हणतात. (स्वयंपाक करणाऱ्याच्या अंगीं वरील सर्व लक्षणें एकवटलेलीं असलीं तरच तो वरील 'संज्ञे'स पात्र ठरतो). ६०

पुत्रप्राप्ति हें भार्या असण्याचें मुख्य कारण; पित्यास पिंड देण्यासाठीं पुत्राची आवश्यकता, मित्र करावयाचा तो आपल्या कल्याणाच्या हेतूनें; सर्व तरतुदींची सोय व्हावी याकरितां द्रव्यसंपादनाची यातायात. ६१

पुस्तकांतच जी विद्या राहून गेली (पाठ न केल्यानें जी वेळेवर सर्व आठवत नाहीं अशी) आहे ती आणि परक्याच्या हातांत गेलेला आपला पैसा हीं दोन्ही आपलीं नव्हेत; कारण त्यांचा उपयोग करण्याची वेळ आली असतां तीं आपल्यापाशीं नसल्यानें असून नसल्यासारखींच होतात. ६२

बालपणीं विद्या संपादन केली नाहीं, तरुणपणीं द्रव्य मिळविल नाहीं आणि प्रौढ वयांत (पारलौकिक कल्याणार्थ) पुण्यसंचय केला नाहीं तर म्हातारपणीं हातून काय होईल? ब्रह्मचर्यादि पहिल्या तीन आश्रमांतील कर्तव्यें ज्या त्या वेळीं बजाविलीं नाहींत तर अखेरच्या संन्यासाश्रमाची पूर्व-तयारी न झाल्यानें त्या आश्रमाचें आचरण कसें साधेल? हा भावार्थ. ६३

अंधारांत रस्त्याचा उपयोग नाहीं (रस्ता असून तो दिसत नसल्यानें आक्रमणास धोक्याचा होतो); स्त्रिया दुश्चरित झाल्या कीं त्या मेलेल्यांतच जमा होतात. शेतांत चांगलें बीं पेरलें नाहीं कीं तें शेत बिलकुल उत्पन्न देत नाहीं; आणि चाकराच्या हलगर्जीपणानें किंवा चुकीनें धन्याचा ('शिष्यापराधे गुरो-र्दण्डः' या न्यायानें) तोटा होतो. अल्पबीज (येथें अल्प म्ह. पेरण्याला निरुपयोगी, अपरिपक्व, कीड लागलेलें, इ. अल्प म्ह. थोडें अस धरल्यास हतं शब्द अयुक्त ठरेल.) ६४

शाहाणीं माणसें अधिकारावर नेमिलीं असतां राजाचा तीन प्रकारचा फायदा होतोः आणि १. त्याची कीर्ति पृथ्वीवर फैलावते, २. त्याचें राज्य सुसंपन्न होतें, ३. 'राज्यांतीं नरक' या सिद्धांताची त्यास बाधा न होतां प्रजेच्या आशीर्वादानें मरणोत्तर त्याला स्वर्गांत स्थान मिळतें. ६५

(मालकाच्या हुकुमानें) कामावर पाठविलेल्या नोकरानें 'मानापमानाचें ओझें अवघें गुंडाळुनि ठेवावें'—मानहानीची पर्वा करूं नये; तापट स्वभा-वाच्या माणसाला सुखावर पाणी सोडण्यास हवें; स्त्रियांच्या अंगीं इंद्रिय-निग्रहत्वाचें पावित्र्य कस बरें राहील? दुर्जनांशीं मैत्री टिकेल कशी?

सतीत्वं = Chastity. ६६

[पूर्वीच्या कित्येक ग्रंथकारांनीं स्त्रियांविषयीं अनेक जागीं फार कडकपणानें लिहिलें आहे; व स्त्रियांच्या अंगीं अनेक दोष स्वाभाविकच असतात असेंहि म्हणण्यास त्यांनीं कसी केलेलें नाहीं. (हल्लींचे ग्रंथकार यांपैकींच आहेत.) परंतु इतर अनेक प्राचीन ग्रंथकारांनीं स्त्रियांच्या सद्गुणांची प्रशंसा करून त्यांस देवतांच्या पदावरहि चढविलें आहे. यास्तव या दोन्हीहि टोंकांकडे न जातां, श्लोकांतील "सतीत्वं" (पातिव्रत्य, पावित्र्य, Chastity) या शब्दाचा उपयोग ग्रंथकारानें स्त्रियांच्या ठिकाणीं त्या गुणाचा अभाव आहे या अर्थानें योजिला असतांहि, भाषांतरांत त्या शब्दाचा अर्थ मीं मुद्दाम थोडा वेगळा केला आहे व त्यायोगें स्त्रियांच्या देहाचें पावित्र्य अबाधित ठेवून त्यांच्या मनांत प्रसंगानें क्वचित् उद्भवलेल्या कुविचारापुरताच राखिला आहे. ग्रंथकाराच्या आशयाप्रमाणें लिहिण्यांत स्त्रियांची निष्कारण बदनामी होते या समजुतीनें त्या अर्थास अवश्य तेवढी मुरड घातली आहे—भाषांतरकर्ता.]

एकमेकांशीं पशुतुल्य वागणाऱ्या मूर्खांच्या समुदायांशीं संपर्क झाल्यामुळें शहाण्या मनुष्याचे सर्व गुण (केव्हां केव्हां पूर्णपणें) झांकले जातात; आकाशांतील ढगांनीं सूर्याचें एवढें प्रखर तेजहि लोपलें जातें—ही नित्याच्या अनुभवाचीच बाब आहे. ६७

ब्रह्महत्त्येचें पातक करणारा मनुष्य देखील खूप पैसेवाला असेल तर तो लोकांस आदरणीय होतो; तेंच दरिद्री मनुष्य चंद्रासमान निष्कलंक वंशांतला असला तरी निवळ दारिद्र्यामुळें लोकांच्या तिरस्कारास पात्र होतो. ६८

उत्तम भोज्य पदार्थ व त्यांस पचविणारी शक्ति, रतिक्रियेचें सामर्थ्य आणि सुंदर स्त्रिया, वैभव आणि दानशूरता या द्विविध वस्तूंची एकाच वेळीं प्राप्ति होणें हें हलक्यासलक्या तपश्चर्येचें फळ नव्हे. वरील जोड्यांपैकीं एक आहे आणि दुसरी नाहीं तर असलेल्या एका वस्तूचाहि उपयोग नाहीं. (दांत आहेत तर चणे नाहींत, नथ आहे तर नाक नाहीं; असा प्रकार काय कामाचा ?) ६९

ज्या अर्थीं पराई इसमास आपल्या मसलतीची बातमी लागल्यास ती मसलत बिघडते त्या अर्थीं आपण मनांत योजिलेला बेत तोंडानें प्रकट करूं नये. (पटकर्णी झालेली गोष्ट गुप्त राहत नाहीं, या अनुभविक सिद्धांतासारखीच ही उक्ति आहे.) ७०

ज्याच्या घरांत आई नाहीं आणि बायको आहे, पण ती नेहमीं दुर्भाषणें करणारी; तर अशा मनुष्यानें अरण्याची वाट धरावी. कारण त्याच्या घरांत आणि अरण्यांत कांहीं तफावतच नाहीं. (उलट अरण्यांत निदान बायकोची वटवट तरी चुकेल.) ७१

ज्या मुलाला आईनें रीत लाविली नाहीं व बापानें शिक्षण देण्याची तजवीज केली नाहीं त्या मुलाचे तीं उभयतां शत्रुच होत. रीतभात व शिक्षण यांच्या अभावामुळें, राजहंसांच्या समुदायांत जसा बगळा तसा तो चार मंडळींत गेला असतां (निराळा) दिसतो. ७२

परस्त्रीस जो मातेप्रमाण मानतो, लोकांचें द्रव्य (किंवा वस्तु) ज्याला मातीसारखें वाटतें आणि प्राणिमात्रांच्या ठिकाणीं ज्याची समबुद्धि असते (जो प्राणिमात्रांस स्वतःसारखेंच समजतो) तोच खरा पंडित. "यः पश्यति स पश्यति" हा पाठ अधिक सरस आहे; वर लिहिल्याप्रमाणें ज्याची दृष्टि आहे तोच डोळस; त्याविरुद्ध प्रकारें पाहणारा पातकी होय–असा अर्थ या पाठानें निघतो. पश्यति = 'पाहतो' म्हणजेच 'समजतो', 'जाणतो', 'मानतो' इ. लोष्ट = मातीचें ढेंकूळ. ७३

राज्याच्या कारभारावर मूर्ख माणसाची योजना केल्यानें राजाच्या पदरीं तीन फळें पडतातः—१. दुष्कीर्ति, २. संपत्तीचा नाश, आणि ३. (अंतीं) नरकप्राप्ति. [वरील ६४ वा श्लोक पहा.] ७४

(कोणत्याहि नाजुक किंवा महत्त्वाच्या कामगिरीवर) दूताची (वकिलाची) योजना करितांना तो १. बुद्धिमान्, २. बोलण्यांत चतुर व पटाईत, ३. सुज्ञ, ४. दुसऱ्याच्या मनांतील भाव व इंगित जाणणारा, ५. निर्भय वृत्तीचा, आणि ६. अवश्य तेवढेंच पण सत्य बोलणारा आहे याची खातरजमा करून घ्यावी. ७५

जेथें आपल्यास कोणी मानीत नाहीं, तसेंच आपल्यावर कोणाचें प्रेम नाहीं किंवा आपल्या हितास जपणारा असा बंधु–आप्त–वर्ग नाहीं आणि कोणतीहि विद्या साध्य करून घेण्याला वाव नाहीं तेथें राहूं नये–तसल्या ठिकाणाचा त्यागच करावा. ७६

ज्याला विचारशक्ति नाहीं त्याला शास्त्र काय पढविणार? आंधळ्याला आरशाचा जितका उपयोग तितकाच शास्त्राचा निर्बुद्धास! ७७

शाश्वत (नित्य) वस्तूला टाकून जो अशाश्वत (अनित्य) वस्तूच्या पाठीस लागतो त्याला सत्य वस्तूची-आणि असत्य वस्तु तर मुळांत अस्तित्वांत नसतातच-ओळखहि होण्याचा संभव नसतो. (एवंच तो दोहोंलाहि मुकतो.) ७८

सोळ्या कुलांत जन्माला येऊन तसेंच तारुण्य व सौंदर्यसंपन्न असूनहि ज्या पुरुषांनीं विद्या संपादिली नाहीं ते सुगंधरहित पळसाच्या झाडाप्रमाणें फक्त दिसावयास बरे! ७९

पांच वर्षांचा होईतों मुलाचे लाड पुरवावेत, त्यापुढील दहा वर्षांत अवश्य तेव्हां त्याला ताडन करण्यास हरकत नाहीं; परंतु तो सोळा वर्षांचा झाला म्हणजे बापानें पुत्राशीं मित्राप्रमाणें वागावें. ८०

लाड करण्यांत पुष्कळ चुकतें; योग्य वेळीं व योग्य कारणास्तव ताडन करण्यांत तोंड्यापेक्षां फायदाच अधिक; म्हणून शिकण्याचें वय झालें म्हणजे मुलगा अथवा शिष्य यांचे लाड न चालवितां जरूर तेव्हां त्यांस शिक्षा करण्यांत कसूर करूं नये. ८१

(उठल्यासुटल्या मुलांस किंवा शिष्यास बडविल्यानें ते खात्रीनें कोडगे व निगरगट्ट होतात आणि ताडन करणाऱ्याचा हेतु कांहीं तडीस जात नाहीं; हें सांगावयास नकोच.)

लोभी माणसाला द्रव्यानें वश करून घ्यावें; रागावलेल्या मनुष्यास हात जोडून (नम्रपणा दाखवून) शांत करावें; मूर्खाला वश करण्याचा उपाय म्हणजे त्याच्या लहरीप्रमाणें वागणें हाच होय; विद्वान् पुरुष वश करून घेण्यास सत्याचरण हा एकच उपाय. ८२

शंभर मूर्ख पुत्रांपेक्षांहि एकच कां असेना पण गुणवान् पुत्र बरा. एकट्या चंद्रामुळें अंधकाराचा नाश होतो, पण ताऱ्यांच्या समुदायानेंहि तें काम होत नाहीं. ८३

विद्यासंपन्नता आणि राजेपणा यांची बरोबरी केव्हांहि होणें नाहीं; राजाचा मान केवळ त्याच्या राज्यांत होतो, पण विद्वानाचा सर्वत्र (कोठेंहि) होतो. ८४

१ रात्रींच्या वेळीं (वाटेल तेथें) भटकणें, २ राजाची कृपा (अनुकूलता, मर्जी), ३ (भ्रतारावांचून) अन्य पुरुषांवर मन गेलेल्या बायका, आणि ४ हयगय केलेला रोग हीं चारी विषासारखीं समजावीं. तीं केव्हां घातक होतील याचा नेम नाहीं. ८५

विषापासून अमृत मिळत असेल तर तें बेशक घ्यावें; अपवित्र (स्पर्श करण्यास अयोग्य) अशा ठिकाणांतून मिळालेल्या सोन्याचा स्वीकार करावा; नीच कुलांतल्या मनुष्याजवळ उत्तम विद्या वा कला असेल तर ती त्याच्यापासून संपादण्यास कांकूं करूं नये; हलक्या कुलांत उत्पन्न झाली एवढ्याच कारणास्तव उत्तम स्त्रियेचा अव्हेर करूं नये–स्वीकार करावा. ८६

वेद आणि वेदांगें यांतील तत्त्व जाणणारा, जपयज्ञपरायण आणि कल्याणप्रद मंगल भाषण करणारा जो ब्राह्मण तोच राजाचा पुरोहित होण्याच्या योग्यतेचा असतो. ८७

वाळलेलें मांस, म्हातारी स्त्री, सकाळचें उन्ह, ताजें दहीं, प्रभातकाळीं स्त्रीसंग किंवा निद्रा या सहांचें सेवन ताबडतोब प्राणहरण करणारें आहे. ८८

प्रत्येक पर्वतशिखरावर कांहीं माणकें सांपडत नाहींत; हरएक हत्तीच्या मस्तकांत कांहीं मोत्यें मिळत नाहींत; साधू लोक कांहीं सर्वत्र असत नाहींत; चंदनाचीं झाडेंहि हरएक वनांत असतात असें नाहीं. या सर्व वस्तु क्वचित् क्वचित् कदाकाळींच दृग्गोचर होतात. ८९

ताजें मांस, ताजें अन्न, नुक्ती वयांत आलेली स्त्री, धारोष्ण दूध अथवा झाडांपासून निघणारा दुधासारखा ताजा रस, शुद्ध तूप आणि उष्ण जल या सहांच्या सेवनाचा उपयोग जीवनशक्ति व उत्साह वाढविण्याच्या कामीं लागलाच होऊं लागतो. ९०

सर्प आणि दुर्जन दोघेहि क्रूर खरे, पण त्यांतल्या त्यांत सापाहून दुर्जनाचें क्रौर्य अधिक प्रखर; मंत्रतंत्र किंवा औषधी (वनस्पति) यांच्या उपचारानें सर्पाची बाधा आटोक्यांत आणतां तरी येते, पण दुर्जनाकडून होणाऱ्या हानीचें निवारण कोण कसें करणार ? ९१

दुर्जनाशीं मैत्री जडून त्याला दुखविल्यामुळें एकदां ती तुटली असतां ती पुनः जोडण्याची खटपट करणारा स्वतःच्या नाशाचीच तयारी करितो असें म्हटलें पाहिजे; कां कीं, त्याची अवस्था अल्पसुखाच्या लालसेनें परिणामीं

मरणाची आपत्ति आणणाऱ्या गर्भाचें ओझें उदरीं सांठविणाऱ्या खेकडीच्या तोडीची होते. [खेकडीचीं पोरें तिचें पोट फोडून बाहेर येतात, या समजावर हा दृष्टांत कवीनें योजिला आह. असुरांच्या कपटानें शुक्राचार्यांच्या पोटांत गेलेल्या कचाला जिवंत करण्याविषयीं देवयानीच्या कळकळीच्या आग्रहाला आचार्यांनीं दिलेल्या पुढील उत्तराचें येथें स्मरण होतें :

शुक्र म्हणे वत्से ! कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर ।
हा तरलाचि परि तुझ या कुव्यसनीं बुडेल माहेर ॥] ९२

एकदांच सांगितलें असतां आशय ध्यानीं धरणारा, हलक्या हातानें लिहिणारा-जलद कलमी, (इतरांचें) अक्षर न अडतां बिनचूक वाचणारा, लेखनकलेचें सर्व तंत्र (लेखणी करतां येण्यापासूनचें) जाणणारा असा जो असेल तोच उत्कृष्ट लेखक होय. ९३

ज्याला नेत्याचें (Leadership) सर्व शास्त्र व तंत्र माहीत आहे, अश्वादि वाहनांच्या संबंधांत ज्यानें परिश्रमपूर्वक अवश्य ती माहिती मिळविली आहे, ज्याच्या अंगीं शौर्य-वीर्यादि गुण आहेत अशाचीच सेनापतीच्या अधिकारावर (पदावर) स्थापना होते. ९४

भूमीचें आवरण समुद्र; गृहाचें आवरण सभोंवारचा तट (कंपाउंड); देशाचें छत्र राजा; आणि स्त्रियांचें आवरण त्यांचें सच्चरित होय. (आवरण हें त्या त्या वस्तूचें सुरक्षितपणाचें मुख्य साधन आहे.) ९५

(खालील श्लोकांत नमूद केलेले एक किंवा अनेक गुण मनुष्यानें पशुपक्ष्यांपासूनहि शिकावे : सिंहापासून एक, कुत्र्यापासून सहा, गाढवापासून तीन, कावळा व कोंबडीं या प्रत्येकापासून चार चार. ९६

(१) लहान असो वा मोठें असो जें कार्य करावयाचें तें साध्य करण्याचा अखेरपावेतों यत्न करणें हा सिंहाचा गुण. ९७

(२) सर्व इंद्रियांचे व्यापार आवरून, योग काळ, देश प्राप्त होई, तों अगदीं स्वस्थ (हालचाल न करितां) राहून संधि येतांच झटक्यानें कार्य उरकणें हा बगळ्याचा गुण. ९८

(३) खादाडपणा (चा) स्वभाव असतांहि मिळेल तेवढ्यांत संतुष्ट राहणें, सावध झोंप, हालचालींत चपळाई, धन्याच्या ठिकाणीं पूर्ण भक्ति, धीटपणा (धाडस) हे कुत्र्याचे सहा गुण. ९९

(४) अविश्रांत श्रम करणें, थंड अगर ऊष्ण हवामानाविषयीं बेफिकीरपणा, आणि नेहमीं समाधानवृत्तीनें असणें हे गाढवाचे तीन गुण. १००

(५) गुप्त मैथुनक्रिया, वेळोवेळीं संग्रह करणें (फावल्या वेळीं खाद्याचा सांठा करून ठेवणें), सर्वकाल सावध असणें, आणि निरलसता (सतत उद्योग करण्याची आस्था) हे कावळ्याचे चार गुण. १०१

(६) द्वंद्वयुद्धाची (झुंझ खेळण्याची) आवड अथवा तयारी, सूर्योदयापूर्वी उठून आपल्या उद्योगास लागणें, स्वकीयांबरोबर एकत्र एके ठिकाणीं व (एकाच वेळीं) खाणें, आणि माद्यांच्या रक्षणाविषयीं तत्परता हे चार कोंबड्याचे गुण. १०२

ज्याची शेती नित्य पिकते, रोगराईचें नांव नसल्यानें ज्याचें आयुष्य सुखरूपपणें जातें, ज्याची बायको नवऱ्याच्या कलाप्रमाणें चालणारी असल्यानें त्याची आवडती असते, त्याच्या घरांत सर्वत्र आनंद नांदत असतो. १०३

ज्यावर फळें (पुष्कळ) आहेत व ज्याची सांवली दाट पडते अशा मोठ्या वृक्षाखालीं (विश्रांतीकरितां वगैरे) उतरावें. (आपल्या कमनशिबानें) एखादे वेळीं (इतर पांथस्थांनीं फळें पाडून नेलीं असल्यास) जरी वृक्षावर फळ मिळालें नाहींच तरी पण सांवली खास मिळतेच (ती कांहीं कोणी काढून नेऊं शकत नाहीं). १०४

ज्या श्राद्धकर्मांत विद्वान् ब्राह्मणास आमंत्रण नाहीं तें श्राद्धकर्म निष्फळ; ज्या यज्ञयागांत दक्षिणेस फांटा दिला असेल तें यज्ञकर्महि विफल; एखादी स्त्री अत्यंत रूपवती असून संततिहीन असेल तर त्या स्त्रीचें जीवन फुकट; आणि सैन्याला नायक (नेता) नसेल तर तें सैन्यहि निरुपयोगी होय. १०५

विलंब किंवा आळस केला तर कार्यनाश ठेवलेला; मनुष्य भिकाऱ्याच्या स्थितीस येऊन पोंचला कीं त्याची अक्कल गुंग होते; दुसऱ्याजवळ तोंड वेंगाडलें कीं अपमान ठेवलेला आणि खा खा सुटली कीं घर बसलेंच म्हणून समजावें. १०६

SANSKRIT VIDYA PEETH TIRUPATI
X:(W2) N40 866